अर्जदार यांचा उलटतपास गैरअर्जदार क्र. १ व २ यांचेकडुन सरकारी वकील एस. एस. सुर्यवंशी यांचेकडुन शपथेवर सुरु -

१. जमीन गट क्र. ८९ मधील क्षेत्र मीच कसत होतो. हे म्हणणे खरे आहे की, साठवण तलाव होण्यापुर्वी मोजणी अधिकारी, तळयाचे अधिकारी हे माझे शेतात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझेकडे व बाजुच्या शेतक-याकडे त्यांनी चालु भावाची चौकशी केली. मी दिलेल्या माहितीनुसार अधिका-यांनी खरेदीखताच्या नकला काढल्या याबबात मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, शासनाने माझ्या जमिनीला ३७,५००/- प्रति हेक्टर प्रमाणे भाव दिला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमिनीत असलेल्या दगडी पौळ, ५ बोरीची झाडे व १ आंब्याचे छोटे झाड याबाबत शाासनाने मुल्यांकन करून मला त्याचा मावेजा दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी मावेजाची रक्कम खुशीने उचलली. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मुदतीमध्ये नाही. माझ्या मुलाची जमीन गट क्र. ७४३ मधुन माझी जमीन गट क्र. ८९ मध्ये पाईपलाईन केले संदर्भात पाईपलाईन खरेदीच्या पावत्या मी दाखल केलेल्या नाहीत. त्या मी दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमिनीमध्ये व गट क्र. ७४३ मध्ये पाच ते सहा किमी अंतर आहे. त्या वेळेस माझ्या जमिनीचा भाव र.रु.२५००/- प्रति आर होता याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अलियाबाद हे माझ्या जमिनीपासुन तीन ते साडेतीन किमी अंतरावर आहे. गंगाबाई पाटील यांच्या जमिनीचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. गंगाबाई पाटील यांच्या जमिनीचा व्यवहार एक लाख रुपये प्रति एकरी प्रमाणे झाला. हे म्हणणे खरे नाही की, गंगाबाई पाटील यांची जमीन माझ्या जमिनीच्या प्रतिपेक्षा चांगली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या दाव्यामध्ये माझ्या जमिनीत असलेल्या झाडांचे मुल्यांकन केलेबाबतचा अहवाल दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुल्यांकन अधिकारी यांनी माझ्या जमिनीमध्ये येवुन झाडांचे मुल्यांकन केले नसल्यामुळे मी त्या संदर्भातील अहवाल दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या सातबारा उता-यावर पाईपलाईन व बागायती पिके घेतल्याची नोंद नाही. साक्षीदार स्वत: होऊन सांगतात की, नाल्याची नोंद आहे व नाल्याच्या पाण्यावर आम्ही पिके घेत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी जो अर्ज केलेला आहे तो जास्तीचा मावेजा मिळण्याकरीता केलेला आहे. मी अंदाजाने माझे जमिनीचा भाव

र.रु.२५००/- प्रति गुंठा असे जे नमुद केले आहे ते अंदाजाने नमुद केले आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा अर्ज खोटया मजकुरावर आधारीत आहे.

२. गैरअर्जदार क्र. ३ यांचे वकील यांना पुकारले असता गैरहजर. सबब, त्यांच्यामार्फत उलटतपास नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
स्वाक्षरीत/-

दिनांकः २२.०७.२०२६

(श्रीमती. एस. डी. अवसेकर )
दिवाणी न्यायाधीश व स्तर, तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P. D.F. file judgment /order/issues /evidence are same, word to word, as per the original judgment/order/issues/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. S. D. Awasekar<br>Civil Judge, Senior Division, Tuljapur, District -Dharashiv. |
| Date | --- | 22/07/2026 |
| Judgment/order/issues/evidence signed by the Presiding Officer on | --- | 22/07/2026 |
| Judgment/order/issues/ evidence uploaded on | --- | 22/07/2026 |